**केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५**
**कार्यवाही करणेबाबत**

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्र -केंमाअ-२००८/प्र.क्र.१३७/समन्वय कक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक- ११ जानेवारी,२००८

## परिपत्रक

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा अस्तित्वात येऊन २ वर्षांचा कालावधी झाला आहे. सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकारी आपले काम चोखपणे करीत आहे की नाही, हे आता या कायद्यामुळे जनता पाहू शकते. त्यानुसार सर्वसामान्य व्यक्तीला माहिती मिळविण्याचा अधिकार या कायद्यामुळे प्राप्त झाला आहे. राज्यातील विविध संस्था संघटना लोक शिक्षण, लोक जागृतीमुळे महाराष्ट्र राज्य हे देशातील माहिती अधिकाराचे वापर करणारे आघाडीवर असणारे राज्य आहे. तथापि, राज्यातील अधिकांश सरकारी कार्यालयाबाहेर जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नांवाचे बोर्ड लावलेले नाहीत. त्याचप्रमाणे कायद्याच्या कलम ४ प्रमाणे प्रत्येक खात्याने आपली इंटरनेटवर वेबसाईट ओपन केलेली नाही. अशी तक्रार मा.श्री.अण्णा हजारे यांनी केली होती. त्यास अनुसरुन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार खालील सूचना सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत..

२. विद्यार्थ्यांमध्ये विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये माहितीच्या कायद्यातील तरतूदीबाबत जागृती निर्माण होऊन या कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्याचा कसा फायदा होईल, त्यामुळे प्रशासनातील पारदर्शकता कशी वाढेल, प्रशासन जनताभिमुख होण्यासाठी याची कशी मदत होईल,यासाठी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, क्वीज कॉम्पीटीशन, वादविवाद स्पर्धा अशा माध्यमातून विद्यार्थी व युवकांमार्फत

माहितीच्या कायद्याचा प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी तयार करुन कार्यवाही करण्यात यावी.

३. ग्राम सभेमध्ये माहितीचा अधिकार अधिनियमाची माहिती देण्याबाबतचा विषय विषयसूचीवर कायम स्वरुपी घेण्यात यावा. त्यामध्ये माहितीच्या अधिकाराखाली किती अर्ज प्राप्त झाले, किती अर्जांचा निपटारा करण्यात आला, किती अर्ज प्रलंबित राहीले इत्यादीबाबत प्रत्येक ग्रामसभेमध्ये चर्चा करण्यात यावी.

४. ग्रामसेवक हा ग्रामस्तरावरील एक महत्वाचा दुवा आहे.विशेषत: ग्रामसभेशी त्याचा निकटचा संबंध येतो. ग्राम सेवकांना माहितीच्या कायद्याच्या तरतूदीबाबत प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची अंमलीबजावणी करण्यात यावी.

५. काही ठिकाणी प्रथम अपिलीय अधिकारी हा जन माहिती अधिकाऱ्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचा नेमलेला आहे, असे निदर्शनास आले आहे. अपिलीय अधिकारी हा माहिती अधिकाऱ्यापेक्षा अधिक व पुरेसा अनुभवी असल्यामुळे नागरिकांच्या नेमक्या अडचणीची त्यास कल्पना असते. तसेच त्याला आपल्या वयाचा अनुभवाचा व अधिकाराचा वापर नि:पक्षपातीपणे करायचा असतो, याचेही त्याला पुरेसे भान असते. ही बाब विचारात घेता प्रशासकीय दृष्टया प्रथम अपिलीय अधिकारी हा जनमाहिती अधिकाऱ्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचा असणे योग्य नाही. ही बाब विचारात घेता सर्व ठिकाणी माहिती अधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ असलेला अपिलीय अधिकारीच नेमण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

६. शासनाकडे प्राप्त झालेल्या माहितीमध्ये असे निदर्शनास आले आहे की, ग्राम-पंचायतीमध्ये ग्रामसेवक हे जनमाहिती अधिकारी असतात. तर गट विकास अधिकारी हे अपिलीय प्राधिकारी असतात. गट विकास अधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी हा तालुका स्तरावरील अधिकारी असून त्याच्याअंतर्गत २००-२५० ग्राम-पंचायती असतात. एवढया प्रमाणात त्यांचेकडे अपिले प्राप्त झाल्यास माहिती अधिकारांतर्गत अपिले निकाली काढण्यास विलंब होऊ शकेल व अपिलकर्त्यास योग्य न्याय मिळणार नाही. ही बाब विचारात घेता १५-२० ग्रामपंचायतीसाठी जनमाहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा एक अधिकारी यांना

अपिलीय प्राधिकारी म्हणून नियुक्त करावे. त्यामुळे नागरिकांना माहितीच्या अधिकाराअंतर्गत अपिलांवर निर्णय मिळण्यास सोयीचे होईल.

७. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत राज्य शासनाकडील विविध मंत्रालयीन विभागांकडे व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दाखल होणारी प्रथम अपीले ही निमन्यायीक (quasi-judicial) स्वरुपाची असतात त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यानी या अनुषंगाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन करणे क्रमःप्राप्त ठरते. म्हणून प्रथम अपिलीय अधिकाऱ्यानी अर्जदारास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन प्रकरण निकाली काढणे आवश्यक असते. यासंदर्भात शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.केंमाअ-२००७/७११८२/प्र.क्र. ६५/०७/६(माअ), दिनांक १२ डिसेंबर,२००७ अन्वये दिलेल्या सूचनांकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर संगणक सांकेतांक क्रमांक -२००७१२१२१६४१५८००१ वर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात.

८. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २५ (२) व (३) नुसार माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या अर्जाच्या संदर्भातील माहिती राज्य माहिती आयोगाला दरमहा सादर करणे आवश्यक आहे. सर्व जनमाहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांनी सदर माहिती सादर करण्याकरिता विहीत करण्यात आलेल्या **१,२,४ व ५ विवरणपत्रामध्ये** माहिती भरुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आपल्या उप आयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास न चुकता पाठविण्याची दक्षता घ्यावी.

९. उपरोक्त २ ते ८ परिच्छेदामध्ये दिलेल्या सूचनांनुसार त्वरित कार्यवाही करुन त्याचा अहवाल एक आठवडयाचे आंत शासनास पाठवावा.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००८०१११२३६२९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दिनेश कुमार जैन)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे स्वीय सहाय्यक
विभागीय आयुक्त (सर्व)
सह सचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)
उप आयुक्त (विकास/आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
सर्व अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (ग्राम विकास खुद्द)
मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती/समन्वय कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग